पुराव्यावर आधारीत प्रकल्प संनियत्रंण प्रणाली (Evidence Based Project Monitoring System) **विकसित करण्याच्या अनुषंगाने** KPMG Ltd **या संस्थेच्या नियुक्तीस दि. ३१/०४/२०१८ पर्यंत मुदतवाढीबाबत.**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : माविका-२०१६/प्र.क्र.१५/१४१८
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक- ३१ मार्च, २०१८

वाचा :

१. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. एफएनएस का.१४२६/प्र.क्र. १४२/३३०५, दि. १८ ऑक्टोबर, २००६
२. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. : असांस१३१४/ /प्र.क्र.१२८/ का.-१४१८, दि.३० मार्च, २०१६
३. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे आदेश क्र. पीएमएस-२०१६/सल्लानि/२९/इआसं/१०५१, दि. २९ नोव्हेंबर,२०१६
४. नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८, दि. ८ मार्च, २०१७
५. नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८, दि. १८ जुलै, २०१७
६. माहिती तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक:
GAD-मातंसं ०८०/४/२०१४-O/O DIRECTORATE of IT-DIT(MH), दि. ९ ऑक्टोबर, २०१७.
७. नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८, दि. २९ सप्टेंबर, २०१७
८. नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८, दि. ३० डिंसेबर, २०१७
९. नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. माविका-२०१६/प्र.क्र. १५/१४१८, दि. ३१ जानेवारी, २०१८
१०. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे पत्र क्र. पीएमएस-२०१६/सल्लानि/२९/इआसं/१८४, दि. १६ मार्च, २०१८

प्रस्तावना :

अर्थसंकल्पीय योजनांसाठी एव्हिडंस बेस्ड् फोटोग्राफीद्वारे संनियंत्रण प्रणाली(EBPMS) विकसित करण्याबाबतच्या कार्यवाहीचा भाग म्हणून प्रथमत: पथदर्शी प्रकल्प म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग व वस्त्रोद्योग विभाग (रेशीम उद्योग) या विभागांसाठी सदर प्रणाली अर्थ व सांख्यिकी संचालनालय, संबंधित प्रशासकीय विभाग व महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, नागपूर येथील तज्ञ अधिकाऱ्यांच्या सहकार्याने विकसित करण्यात येत आहे. ही प्रक्रिया अंतिम करण्यासाठी तसेच मंत्रालयीन उर्वरित इतर विभागांसाठी ही प्रणाली विकसित करण्याच्या दृष्टीने त्या विभागात सध्या अस्तित्वात/कार्यरत असलेल्या प्रणालींचा अभ्यास करुन व ज्या विभागात प्रणाली उपलब्ध नाही त्या विभागांच्या कामकाजाचा / कार्यक्रम कार्यान्वयनाचा अभ्यास करुन प्रकल्प अहवाल तयार करणे व अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपरोक्त संदर्भिय (५) अन्वये KPMG Limited यांच्याकडून Principal Consultant (०.५ पदे Part Time), Senior Consultant (२ पदे) व Consultant (२ पदे) यांच्या सेवा प्रथमत: सहा महिन्यासाठी घेण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर पदांव प्रथम ३ महिन्यांसाठी नियुक्ती करुन संदर्भिय(४) च्या आदेशान्वये

गठीत मूल्यमापन समितीने कामांचे मूल्यमापन करुन मुदतवाढीबाबत निर्णय घेण्यात यावा, असे उपरोल्लेखित शासन निर्णयामध्ये नमूद आहे.

२. मे. KPMG Limited ला दिलेला सहा महिन्यांचा कालावधी दि.१६/१०/२०१७ रोजी संपुष्टात आला. त्यामुळे व EBPMS साठी सल्लागार नियुक्ती संदर्भातील Request for Proposal मधील सल्लागार संस्थेने करावयाची कामे (Technical Scope) व या अनुषंगाने कार्यमर्यादेतील महत्त्वाची उद्दीष्टे (Key Deliverables) पूर्ण व्हावयाची असल्यामुळे संदर्भिय (७) अन्वये KPMG Limited यांचेकडून सल्लागार यांच्या सेवा घेण्यास दि. ३०/१२/२०१७ पर्यंत मूदतवाढ देण्यात आली. तद्नंतर नियोजन विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीने दि. २८/१२/२०१७ रोजीच्या बैठकीत पुनश्च: कामाचा आढावा घेऊन प्रथमत: ३१/०१/२०१८ पर्यंत व पुढील ३१/०३/२०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी संचालनालयाच्या मूल्यमापन समितीने आढावा घेऊन मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्याची शिफारस केली होती. यास अनुसरून संदर्भिय (८) अन्वये KPMG Ltd. या सल्लागार संस्थेस दि. ३१/०१/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. तथापि दि. ३१/०१/२०१८ पर्यंत नेमून दिलेले काम पूर्ण न झाल्यामुळे संचालनालयाच्या मूल्यमापन समितीच्या शिफारशीनुसार संदर्भिय (९) अन्वये KPMG Ltd. संस्थेस दि. ३१/०३/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

३. माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाच्या दि. ०४/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये Empanelment of Consultants ना दि. ३०/०६/२०१८ पर्यंत मुदतवाढ दिली असून, सल्लागारां ची सेवा ३०/०६/२०१८ रोजी अथवा तत्पूर्वी समाप्त होणे आवश्यक आहे व सदर बाब दि.३१/०३/२०१८ पूर्वी निर्गमीत केलेल्या अथवा दि. ३१/०३/२०१८ पर्यंत निर्गमित व्हावयाच्या कार्यारंभ आदेशास लागू राहतील, असे नमूद केले आहे. मे.केपीएमजी. लि. यांची नियुक्ती ३१/०३/२०१८ पूर्वी म्हणजेच दि.२१/३/२०१७ च्या कार्यारंभ आदेशान्वये झाली असून त्यांना दिलेली मुदतवाढीचा कालावधी दि.३१/३/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे.

४. EBPMS साठी सल्लागार नियुक्ती संदर्भातील Request for Proposal मधील मे.केपीएमजी.लि या सल्लागार संस्थेने Technical Scope नुसार करावयाचे Detail Project Report (DPR) तसेच System Integrator (SI) नियुक्ती साठी Request of Proposal (RFP) सादर केले असले तरी अद्याप अंतीम झालेले नाहीत व त्यामुळे RFP बाबतची प्रक्रिया सुरू झालेली नाही.

५. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संदर्भिय (१०) अन्वये केलेल्या शिफारसी विचारात घेता वरील कामे पूर्ण करण्यासाठी KPMG Limited यांना दि. ३१/०४/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय :

EBPMS या संगणकीय प्रणाली विकसीत करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या KPMG Limited या संस्थेस सल्लागार नियुक्ती संदर्भातील ‘Request for Proposal (RFP)’ मधील सल्लागार संस्थेने करावयाची तांत्रिक स्वरुपाची कामे (Technical Scope) व या अनुषंगाने कालमर्यादेतील महत्त्वाच्या

उद्दीष्टानुसार (Key Deliverables) प्रलंबित कामे पूर्ण करणेकरीता KPMG Limited यांच्याकडून सध्या कार्यरत असणाऱ्या ५ सल्लागारांपैकी १ वरीष्ठ सल्लागार (Senior Consultant) यांची सेवा पुढे दिनांक ३०/०४/२०१८ पर्यंत चालू ठेवण्याबाबत तसेच उर्वरीत ४ सल्लागार Principal Consultant (०.५ पदे Part Time), Senior Consultant (१ पदे) व Consultant (२ पदे) यांची सेवा दिनांक ३१/०३/२०१८ नंतर खंडीत करण्याबाबत शासन मान्यता देत आहे.

२. KPMG Ltd. चे दि. ०१/०४/२०१८ नंतर कार्यरत राहणारे १ वरीष्ठ सल्लागार यांनी प्रति दिवशी अर्थ व सांख्यिकी संचालनालय व महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC), नागपूर यांच्या अधिकाऱ्यांसमवेत बसून वरील नमूद प्रलंबित कामे विहीत वेळेत पूर्ण करुन As-Is-Report, To-Be-Report, Detailed Project Report (DPR) व Request For Proposal (RFP) हे महत्त्वाचे ४ दस्तावेज (४ Documents) ची छापील प्रती व त्याची Soft Copy दिनांक २७/४/२०१८ पूर्वी अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडे सुपूर्द करावेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३३१११४४४५६३१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijesing Fattesing Vasave

Digitally signed by Vijesing Fattesing Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7de9682e22326e67a2c7e4125e6587 21c298e35048adffdff595b37a1b194aa, cn=Vijesing Fattesing Vasave
Date: 2018.04.11 17:51:28 +05'30'

(वि.फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री(वित्त व नियोजन), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा/ विधान परिषद), महाराष्ट्र राज्ययांचे खाजगी सचिव
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
७) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र, व्हीएनआयटी कॉलेज परिसर,दक्षिण अंबाझरी रोड, नागपूर-४४०००१.
८) उप महासंचालक, नॅशनल इन्फोर्मेटीक्स सेंटर, पुणे
९) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
१०) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा - पूर्व, मुंबई-५१
११) अपर मुख्य सचिव (नियोजन) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) नियोजन विभागातील सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव
१३) निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग. मंत्रालय, मुंबई-३२.